# ९ कुटुंब



## चला, शिकू या...

- संबंध दाखवणे
- स्वतःच्या कुटुंबाबद्दल माहिती सांगणे
- मालकी हक्क
- १०० च्या पुढील अंक
- प्रश्नशब्द : कोणाचा, कोणाची, कोणाचे

## १ खालील चित्रे पाहून गाळलेल्या जागा भरू या.










(तनिष्काची शाळा, आदित्यचे मांजर, योगिताचे मूल, मंदारची गाडी, अक्षयचा भ्रमणध्वनी, नेत्राचा कुत्रा)

१. अक्षयचा भ्रमणध्वनी खूप महाग आहे.

२. --------------- --------------- तीन वर्षांचे आहे.

३. --------------- --------------- सफेद रंगाचे आहे.

४. --------------- --------------- महात्मा गांधी मार्गावर आहे.

५. --------------- --------------- हल्ली सतत भुंकत असतो.

६. --------------- --------------- लाल रंगाची आहे.











| | | | | |
|---|---|---|---|---|
| अक्षयचा | भ्रमणध्वनी | | अक्षयचे | भ्रमणध्वनी |
| मंदारची | गाडी | त्याचप्रमाणे | मंदारच्या | गाड्या |
| योगिताचे/चं | मूल | | योगिताची | मुले/लं |

## २ महाराष्ट्राचा नकाशा वाचू या.




मुलांचा चित्रमय महाराष्ट्र, विद्याधर अमृते आणि प्रसाद गोगटे

| उदा॰ **शिक्षक/शिक्षिका** | उदा॰ **शिक्षक/शिक्षिका** |
| --- | --- |
| हा कोणाचा लॅपटॉप आहे ? (आनंद) | आनंदचा |

| **शिक्षक/शिक्षिका** | **विद्यार्थी/विद्यार्थिनी** |
| --- | --- |
| हा कोणाचा लॅपटॉप आहे ? (आनंद) | आनंदचा |
| हा कोणाचा लॅपटॉप आहे ? (कविता) | कविताचा |
| हा कोणाचा लॅपटॉप आहे ? (आरती) | आरतीचा |
| हा कोणाचा लॅपटॉप आहे ? (केदार) | केदारचा |
| हा कोणाचा लॅपटॉप आहे ? (महेश) | महेशचा |
| ... | ... |

| उदा॰ **शिक्षक/शिक्षिका** | उदा॰ **शिक्षक/शिक्षिका** |
| --- | --- |
| ही कोणाची चावी आहे ? (आनंद) | आनंदची |

| **शिक्षक/शिक्षिका** | **विद्यार्थी/विद्यार्थिनी** |
| --- | --- |
| ही कोणाची चावी आहे ? (आनंद) | आनंदची |
| ही कोणाची चावी आहे ? (अक्षय) | अक्षयची |
| ही कोणाची चावी आहे ? (आरती) | आरतीची |
| ही कोणाची चावी आहे ? (केदार) | केदारची |
| ही कोणाची चावी आहे ? (कविता) | कविताची |
| ... | ... |

| उदा॰ **शिक्षक/शिक्षिका** | उदा॰ **शिक्षक/शिक्षिका** |
| --- | --- |
| हे कोणाचे पेन आहे ? (आनंद) | आनंदचे |

| **शिक्षक/शिक्षिका** | **विद्यार्थी/विद्यार्थिनी** |
| --- | --- |
| हे कोणाचे पेन आहे ? (आनंद) | आनंदचे |
| हे कोणाचे पेन आहे ? (आरती) | आरतीचे |
| हे कोणाचे पेन आहे ? (अक्षय) | अक्षयचे |
| हे कोणाचे पेन आहे ? (केदार) | केदारचे |
| हे कोणाचे पेन आहे ? (कविता) | कविताचे |
| ... | ... |

| | |
|---|---|
| उदा॰ **शिक्षक/शिक्षिका** | उदा॰ **शिक्षक/शिक्षिका** |
| ही कोणाची सायकल ? (महेश) | महेशाची |
| **शिक्षक/शिक्षिका** | **विद्यार्थी/विद्यार्थिनी** |
| हा कोणाचा शर्ट ? (आनंद) | आनंदचा |
| हे कोणाचे/चं घड्याळ ? (अलका) | अलकाचे/चं |
| हा कोणाचा लॅपटॉप ? (कविता) | कविताचा |
| ही कोणाची चावी ? (शैलेश) | शैलेशची |
| हे कोणाचे/चं पेन ? (आरती) | आरतीचे/चं |
| ही कोणाची बाटली ? (सुप्रिया) | सुप्रियाची |
| ... | ... |

| | |
|---|---|
| उदा॰ **शिक्षक/शिक्षिका** | उदा॰ **शिक्षक/शिक्षिका** |
| हे कोणाचे पैसे आहेत ? (आनंद) | आनंदचे |
| **शिक्षक/शिक्षिका** | **विद्यार्थी/विद्यार्थिनी** |
| हे कोणाचे पैसे आहेत ? (आनंद) | आनंदचे |
| हे कोणाचे कपडे आहेत ? (आरती) | आरतीचे |
| हे कोणाचे कुर्ते आहेत ? (अक्षय) | अक्षयचे |
| हे कोणाचे मोजे आहेत ? (महेश) | महेशाचे |
| हे कोणाचे सामोसे आहेत ? (कविता) | कविताचे |
| ... | ... |

| | |
|---|---|
| उदा॰ **शिक्षक/शिक्षिका** | उदा॰ **शिक्षक/शिक्षिका** |
| या कोणाच्या चाव्या आहेत ? (आनंद) | आनंदच्या |
| **शिक्षक/शिक्षिका** | **विद्यार्थी/विद्यार्थिनी** |
| या कोणाच्या चाव्या आहेत ? (आनंद) | आनंदच्या |
| या कोणाच्या गाड्या आहेत ? (आरती) | आरतीच्या |
| या कोणाच्या चपला आहेत ? (अक्षय) | अक्षयच्या |
| या कोणाच्या खुर्च्या आहेत ? (महेश) | महेशाच्या |
| या कोणाच्या सायकली आहेत ? (कविता) | कविताच्या |
| ... | ... |

| | |
|---|---|
| उदा॰ **शिक्षक/शिक्षिका** | उदा॰ **शिक्षक/शिक्षिका** |
| ही कोणाची घरे आहेत ? (आनंद) | आनंदची |
| **शिक्षक/शिक्षिका** | **विद्यार्थी/विद्यार्थिनी** |
| ही कोणाची घरे आहेत ? (आनंद) | आनंदची |
| ही कोणाची पुस्तके आहेत ? (अक्षय) | अक्षयची |
| ही कोणाची चित्रे आहेत ? (महेश) | महेशाची |
| ही कोणाची टेबले आहेत ? (आरती) | आरतीची |
| ही कोणाची पत्रे आहेत ? (कविता) | कविताची |
| ... | ... |

| शिक्षक/शिक्षिका | शिक्षक/शिक्षिका |
|---|---|
| उदा॰ या कोणाच्या सायकली ? (महेश) | उदा॰ महेशच्या |

| शिक्षक/शिक्षिका | विद्यार्थी/विद्यार्थिनी |
|---|---|
| हे कोणाचे शर्ट ? (आनंद) | आनंदचे |
| ही कोणाची घड्याळे ? (अलका) | अलकाची |
| हे कोणाचे लॅपटॉप ? (सकीना) | सकीनाचे. |
| या कोणाच्या चाव्या ? (शैलेश) | शैलेशच्या |
| ही कोणाची पेने ? (आरती) | आरतीची |
| या कोणाच्या बाटल्या ? (मारिया) | मारियाच्या |

| शिक्षक/शिक्षिका | शिक्षक/शिक्षिका |
|---|---|
| उदा॰ तुम्ही मुंबईचे का ? | हो, मी मुंबईचा. |
| तुम्ही मुंबईच्या का ? | हो, मी मुंबईची. |

| शिक्षक/शिक्षिका | विद्यार्थी/विद्यार्थिनी |
|---|---|
| तुम्ही नागपूरचे / नागपूरच्या का ? | हो, मी नागपूरचा / नागपूरची. |
| तुम्ही सांगलीचे / सांगलीच्या का ? | हो, मी सांगलीचा / सांगलीची. |
| तुम्ही रत्नागिरीचे / रत्नागिरीच्या का ? | हो, मी रत्नागिरीचा / रत्नागिरीची. |
| तुम्ही नाशिकचे / नाशिकच्या का ? | हो, मी नाशिकचा / नाशिकची. |
| तुम्ही चंद्रपूरचे / चंद्रपूरच्या का ? | हो, मी चंद्रपूरचा / चंद्रपूरची. |
| तुम्ही कोल्हापूरचे / कोल्हापूरच्या का ? | हो, मी कोल्हापूरचा / कोल्हापूरची. |

## ३ सुरभीची खोली बघू या आणि काय काय दिसतंय ते लिहू या.







उदा॰ **सुरभीची गिटार**

१. ----------------------------.
२. ----------------------------.
३. ----------------------------.
४. ----------------------------.
५. ----------------------------.
६. ----------------------------.
७. ----------------------------.
८. ----------------------------.

## ४ या, मी तुमची माझ्या घरच्यांशी ओळख करून देते.

१


२



५

३



४

### वरील चित्रे पाहू या, खालील वाक्ये वाचू या व चौकटीत योग्य तो क्रमांक लिहू या.

☐ मी मीरा, आणि हे माझं कुटुंब.

☐ हा माझा भाऊ अक्षय. आणि ती त्याची बायको - म्हणजे माझी वहिनी - पूजा.

☐ हे माझे आजी-आजोबा. माझे आजोबा ८३ वर्षांचे आहेत व माझी आजी ८० वर्षांची आहे. आजोबांचं नाव आहे सदानंद आणि आजीचं अनसूया.

☐ ही माझी ताई - म्हणजेच मोठी बहीण - कस्तुरी. ती २८ वर्षांची आहे. तिला प्राण्यांची आवड आहे. तो तिचा कुत्रा बूझो.

☐ आणि हे माझे आई-बाबा. माझे बाबा पायलट आहेत नि आई डॉक्टर.

| | |
|---|---|
| मी | माझा |
| | माझी |
| | माझे/माझं |

| | |
|---|---|
| माझा | भाऊ |
| माझी | बहीण |
| माझे/माझं | कुटुंब |

| | |
|---|---|
| माझा | कागद |
| माझी | पेन्सिल |
| माझे/माझं | पुस्तक |

व्याकरण



**स्वराज्य हा माझा जन्मसिद्ध हक्क आहे.**

- लोकमान्य बाळ गंगाधर टिळक



## ५ चला, नातेवाइकांशी ओळख करून घेऊ या.

काका दादा मावशी
मामी बहीण काकी/काकू
आजी मामा आजोबा
आत्या

१. आईचा भाऊ, माझा ---------------
२. मामाची बायको, माझी -------------
३. बाबांचा भाऊ, माझा/माझे ----------
४. काकांची बायको, माझी ------------
५. आईची मुलगी, माझी ---------------
६. मोठा भाऊ, माझा -------------------
७. आईचे/बाबांचे बाबा, माझे ----------
८. आईची/बाबांची आई, माझी ---------
९. बाबांची बहीण, माझी ---------------
१०. आईची बहीण, माझी ---------------

## ... आणि हा आहे माझा मित्र-परिवार.



हा बघा, किती छान फोटो आहे आमचा कॉलेजमधला.
हे तेजस, हृषिकेश आणि जय - माझे अगदी खास मित्र.



आणि हा फोटो बघा, शाळेतला.
ही पूजा, ही आरती, आणि ही अक्षया. या माझ्या अगदी जवळच्या मैत्रिणी. आम्ही सगळ्या अजूनही एकमेकींच्या संपर्कात आहोत. फेसबुकवर तर जवळपास रोजच भेटतो.



आणि ही आहेत माझी गिर्यारोहणातील मित्रमंडळीः आशिष, दीपाली, संकेत, राल्फ आणि योकोता.

| | |
|---|---|
| माझे | मित्र |
| माझ्या | मैत्रिणी |
| माझी | मित्रमंडळी |

| | |
|---|---|
| माझे | कागद |
| माझ्या | पेन्सिली |
| माझी | पुस्तके/पुस्तकं |

## ६ रिकाम्या जागी कंसातील योग्य तो शब्द लिहू या.

(**माझा, माझी, माझे, माझ्या, माझी**)

१. --------------- चेंडू
२. --------------- पुस्तके
३. --------------- मांजर
४. --------------- मुलगा
५. --------------- नवरा
६. --------------- आजी
७. --------------- आई
८. --------------- घर
९. --------------- बहिणी
१०. --------------- वह्या

## ७ खाली दाखविल्याप्रमाणे आदरार्थी प्रश्न बनवू या.

**तुझं** नाव काय ? — आपलं नाव काय ? / तुमचं नाव काय ?

**तुझी** मातृभाषा कोणती ? — ----------------------------------- / -----------------------------------

**तुझा** दूरध्वनि-क्रमांक काय ? — ----------------------------------- / -----------------------------------

## ८ आता खालील कोष्टक पूर्ण करू या.

| दूरध्वनि-क्रमांक | मातृभाषा | नाव |
|---|---|---|
| तुझा | --------------- | --------------- |
| --------------- | तुमची | --------------- |
| --------------- | --------------- | आपलं |

| | पु. एकवचन/अनेकवचन | स्त्री. एकवचन/अनेकवचन | नपुं. एकवचन/अनेकवचन |
|---|---|---|---|
| **मी** | माझा / माझे | माझी / माझ्या | माझे / माझं / माझी |
| **तू** | तुझा / तुझे | तुझी / तुझ्या | तुझे / तुझं / तुझी |
| **तो / ते** | त्याचा / त्याचे | त्याची / त्याच्या | त्याचे / त्याचं / त्याची |
| **ती** | तिचा / तिचे | तिची / तिच्या | तिचे / तिचं / तिची |
| **आम्ही** | आमचा / आमचे | आमची / आमच्या | आमचे / आमचं / आमची |
| **आपण** | आपला / आपले | आपली / आपल्या | आपले / आपलं / आपली |
| **तुम्ही** | तुमचा / तुमचे | तुमची / तुमच्या | तुमचे / तुमचं / तुमची |
| **ते / त्या / ती** | त्यांचा / त्यांचे | त्यांची / त्यांच्या | त्यांचे / त्यांचं / त्यांची |

| उदा॰ शिक्षक/शिक्षिका | उदा॰ शिक्षक/शिक्षिका |
|---|---|
| मी | माझा मित्र |
| **शिक्षक/शिक्षिका** | **विद्यार्थी/विद्यार्थिनी** |
| मी ? | माझा मित्र |
| आम्ही ? | आमचा मित्र |
| तू ? | तुझा मित्र |
| तुम्ही ? | तुमचा मित्र |
| तो ? | त्याचा मित्र |
| ते ? | त्यांचा मित्र |
| ती ? | तिचा मित्र |
| त्या ? | त्यांचा मित्र |
| ते ? | त्याचा मित्र |
| ती ? | त्यांचा मित्र |
| ... | ... |

| उदा॰ शिक्षक/शिक्षिका | उदा॰ शिक्षक/शिक्षिका |
|---|---|
| मी - माझा काका. तो ? | त्याचा काका |
| **शिक्षक/शिक्षिका** | **विद्यार्थी/विद्यार्थिनी** |
| मी - माझा काका. तो ? | त्याचा काका |
| मी - माझी बहीण. ते ? | त्याची बहीण |
| मी - माझी खोली. ते ? | त्यांची खोली |
| मी - माझी पेन्सिल. ती ? | तिची पेन्सिल |
| मी - माझा चेंडू. तू ? | तुझा चेंडू |
| मी - माझे घर. आम्ही ? | आमचे घर |
| मी - माझी मावशी. त्या ? | त्यांची मावशी |
| मी - माझे पुस्तक. तुम्ही ? | तुमचे पुस्तक |
| मी - माझी मुलगी. आपण ? | आपली मुलगी |
| ... | ... |

| उदा॰ शिक्षक/शिक्षिका | उदा॰ शिक्षक/शिक्षिका |
|---|---|
| हा माझा रुमाल आहे. (रुमाल) | हे माझे रुमाल आहेत. |
| **शिक्षक/शिक्षिका** | **विद्यार्थी/विद्यार्थिनी** |
| हा माझा मित्र आहे. (मित्र) | हे माझे मित्र आहेत. |
| ही त्याची बहीण आहे. (बहिणी) | या त्याच्या बहिणी आहेत. |
| हे तिचे घड्याळ आहे. (घड्याळे) | ही तिची घड्याळे आहेत. |
| ही त्यांची बाग आहे. (बागा) | या त्यांच्या बागा आहेत. |
| हा आमचा बंगला आहे. (बंगले) | हे आमचे बंगले आहेत. |
| हे आपले झाड आहे. (झाडे) | ही आपली झाडे आहेत. |
| हा तुमचा वर्ग आहे. (वर्ग) | हे तुमचे वर्ग आहेत. |
| ही तुमची खोली आहे. (खोल्या) | या तुमच्या खोल्या आहेत. |
| ... | ... |



## ९ वरील चित्रात कोण दिसतंय? काय दिसतंय?

पेपर आजी मुलगी भाजी
बाबा चहा
आई मालिका आजोबा लॅपटॉप

| कोण | काय |
|---|---|
| आई | भाजी |
| | |
| | |
| | |
| | |



## १० कोण काय करतंय, त्यांच्या जोड्या जुळवू या.

| कोण | काय करत आहे ? |
|---|---|
| आई | पेपर वाचत आहेत. |
| मुलगी | लॅपटॉपवर काम करत आहे. |
| आजोबा | भाजी चिरत आहे. |
| आजी | चहा घेत आहेत. |
| बाबा | मालिका पाहत आहे. |

## वाचू या.

**देशमुख कुटुंबाची एक संध्याकाळ -**

मी मुक्ता. आमची रोजची संध्याकाळ साधारणपणे अशीच असते. बाबा ऑफिसमधून घरी आल्यावर गरमागरम चहा घेतात. त्यांच्याशी गप्पा मारता मारता आई रात्रीच्या जेवणाकरिता भाजी चिरते. घड्याळात सात वाजले रे वाजले, की अमितचा टी.व्ही. सुरू होतो. पण थोड्या वेळातच त्याला रिमोट आमच्या घरातल्या 'रिमोट कंट्रोल'कडे, म्हणजे आजीकडे सोपवावा लागतो. आजी तिची आवडती मालिका, 'राधा ही बावरी', अगदी न चुकता पाहते. आजीने ही मालिका लावली, की आजोबा त्यांच्या खोलीतूनच 'राधा ही चावरी' असं डोळे मिचकावून गुणगुणतात. आजीचं माहेरचं नाव 'राधा' होतं ना! आजोबांना मालिका पाहायला नाही आवडत. ते त्यांच्या खोलीत बसून पेपर वाचतात. आणि मी - जर मी त्या वेळी घरी असेन तर - लॅपटॉपवर माझं काम करते किंवा घरच्यांशी गप्पा मारते.






## ११ आता सांगा बरं, देशमुख कुटुंब रोज संध्याकाळी काय काय करतं?

| | |
|---|---|
| मालिका पेपर भाजी<br>चहा गप्पा काम | घेणे मारणे वाचणे<br>चिरणे करणे पाहणे |

उदा॰ आई भाजी चिरते.

-----------------------------------------------------------------------------------

-----------------------------------------------------------------------------------

-----------------------------------------------------------------------------------

-----------------------------------------------------------------------------------

| कोण | काय | करतं ? |
|---|---|---|
| आई | भाजी | चिरते |
| मुक्ता | ---------- | ---------- |
| ---------- | ---------- | ---------- |
| आजी | ---------- | ---------- |
| ---------- | ---------- | ---------- |

## वाचू या.

**कुटुंबातील लोकांच्या वेगवेगळ्या तऱ्हा.**



ही आहे श्रुती. श्रुतीला सगळे हळूबाई म्हणतात. ती सगळीच कामं खूप **हळू हळू** करते. ती **हळू** जेवते, **हळू** चालते, बोलतेही **सावकाश.**







आणि तिच्या उलट ओंकार. जलद हा शब्द जणू त्याच्याचसाठी बनवलाय. त्याचं सगळंच **जलद** असतं. तो **जलद** पेपर वाचतो, **भरभर** स्वयंपाक करतो आणि तितकाच वेगाने गाडीही चालवतो.



## वाचू या.

**सरदेसाई कुटुंब हे एक व्हर्चुअल कुटुंब आहे. कसं ते पाहू या.**

मी मुंबई विद्यापीठात प्राध्यापिका आहे. माझे मिस्टर कामानिमित्त दिल्लीला असतात व मुलगी अमेरिकेत नोकरी करते. आम्ही **अनेकदा** स्काईपवरच एकमेकांना भेटतो. मुलीशी मी **भरपूर** गप्पा मारते. मिस्टरांची व माझी कामाची वेळ भिन्न असल्यामुळे आमचं अगदी **क्वचित** बोलणं होतं. तसं असलं तरी **एकदा** का स्काईप सुरू केलं, की आमच्यातील अंतर **पटकन** नाहीसं होतं.




### १२ वरील दोन्ही परिच्छेदांतील ठळक शब्द योग्य त्या गटात लिहू या.

| कसा / कशी / कसे | किती / कितीदा |
|---|---|
| | |
| | |
| | |
| | |

शब्द संपदा

## चला, अंक कसे बनतात ते पाहू या.

१०१ - एकशे एक → १ × शे (१००) + १
१०२ - एकशे दोन → १ × शे (१००) + २
१०३ - एकशे तीन → १ × शे (१००) + ३
२०० - दोनशे → २ × शे (१००)
२०१ - दोनशे एक → २ × शे (१००) + १
३०० - तिनशे → ३ × शे (१००)
४०० - चारशे → ४ × शे (१००)
५०० - पाचशे → ५ × शे (१००)
१००० - एकहजार (हजार) → १ × हजार
२००० - दोनहजार → २ × हजार



संवाद

## १३ आता हा संवाद ऐकू या.

**सुखदा** - अरे, पेपरमध्ये आज टॉप ५ फिक्शन पुस्तकांची नावं आहेत. मला त्यांतली काही हवीयेत. आज संध्याकाळी येतोस का सोबत? 'मॅजेस्टिक'मध्ये जाऊ या.

**अथर्व** - हो, चालेल. मागरिट थॅचर दि ऑथराइज्ड बायोग्राफी ८९६ पानी आहे आणि किंमत ८९९ रुपये आहे. सगळ्यांत मोठं आणि महाग पुस्तक तेच आहे.

| **टॉप ५ फिक्शन** |
| --- |
| **द सी ऑफ इनोसन्स** - किश्वर देसाई, पाने : ४०० / ३५० रुपये |
| **शोज ऑफ डेड** - कोटा नीलिमा, पाने : २८८ / ४९५ रुपये |
| **व्हेन स्ट्रेंजर्स मीट...** - के. हरी कुमार, पाने : २१६ / १०० रुपये |
| **जेकब हिल्स** - इस्मिता टंडन धंकेर, पाने : २६८ / २९९ रुपये |
| **कफ सिरप** - थरून जेम्स जीमानी, पाने : २७६ / २५० रुपये |

| **टॉप ५ नॉन - फिक्शन** |
| --- |
| **द न्यू डिजिटल एज** - एरिक स्मिथ - जेरेड कोहेन, पाने : ३१५ / ६५० रुपये. |
| **हाऊ एशिया वर्क्स** - जो स्टुडवेल, पाने : २८८ / ४९९ रुपये. |
| **दि ऑर्फन मास्टर्स सन** - ॲडम्स जॉन्सन, पाने : ५९२ / ४५० रुपये. |
| **मागरिट थॅचर - दि ऑथराइज्ड बायोग्राफी** - चार्ल्स मूर, पाने : ८९६ / ८९९ रुपये. |
| **कम ऑन इनर पीस - आय डोन्ट हॅव ऑल डे** - सचिन गर्ग, पाने : १३० / १०० रुपये. |

## १४ वरील पुस्तकांची पाने आणि किंमत शब्दांत लिहू या.

१) दि सी ऑफ इनोसन्स - चारशे पाने, किंमत तीनशे पन्नास रुपये.
२) ------------------------------------------------------------.
३) ------------------------------------------------------------.
४) ------------------------------------------------------------.
५) ------------------------------------------------------------.
६) ------------------------------------------------------------.
७) ------------------------------------------------------------.
८) ------------------------------------------------------------.
९) ------------------------------------------------------------.
१०) ------------------------------------------------------------.

### चला, नवे अंक पाहू या.

| | |
|---|---|
| १०,००० | दहा हजार |
| १,००,००० | एक लाख |
| १०,००,००० | दशलक्ष / दहा लाख |
| १,००,००,००० | एक कोटी |
| १,००,००,००,००० | अब्ज |

### म्हणी / वाक्प्रचार

शे-सव्वाशे लोक.
हजारदा सांगणे.
एकाचे दोन करून सांगणे.
स्वामी तिन्ही जगांचा आईविना भिकारी.
सख्खे भाऊ, पक्के वैरी.
सत्राशे साठ.



## १५ खालील शहरांची लोकसंख्या इंटरनेटवरून अंकात व अक्षरात लिहू या.

१. मुंबई - --------------------------------------------------------.
२. कोलकाता - --------------------------------------------------.
३. दिल्ली - ------------------------------------------------------.
४. चेन्नई - ------------------------------------------------------.
५. अहमदाबाद - ------------------------------------------------.
६. न्यु यॉर्क - ---------------------------------------------------.
७. टोकियो - ----------------------------------------------------.
८. बर्लिन - ------------------------------------------------------.


शब्द संपदा

करा आणि शिका

## १६ ऐकू या.

**पप्पा सांगा कोणाचे...**

पप्पा सांगा कोणाचे ? पप्पा माझ्या मम्मीचे !
मम्मी सांगा कुणाची ? मम्मी माझ्या पप्पांची !



इवल्या इवल्या घरट्यात, चिमणा चिमणी राहतात
चिमणा चिमणी अन् भवती, चिमणी पिल्लेही चिवचिवती !
आभाळ झेलते पंखांवरी, बाबांना घरटे प्रिय भारी
चोचीत चोचीने घास द्यावा, पिल्लांचा हळूच पापा घ्यावा !

पंखाशी पंख हे जुळताना, चोचीत चोचही मिळताना
हासते नाचते घर सारे, हासते छप्पर, भिंती, दारे !

■ शांता शेळके



## करा आणि शिका.

१. दोन गट करा. एका गटातील प्रत्येकाला कुटुंबातील एक-एक भूमिका द्या. घराच्या मालकीसंबंधी त्यांचे भांडण चालू आहे. त्यांचा संवाद तयार करा. दुसऱ्या गटाने ओळखा, कोण कोणाची भूमिका करत आहे.
२. लिहा - घरी तुम्ही तुमचा वेळ कसा घालवता ?
३. आता तुमच्या कुटुंबाचा परिचय द्या.
४. रिकाम्या चौकटीत तुमच्या कुटुंबाचा एक फोटो लावा व तुमच्या सहकाऱ्यास तुमच्या कुटुंबाचा परिचय करून द्या.

हा/ही मी आहे. हे माझे/माझं...हा माझा...ही माझी...
उजवीकडे...
पुढे/मागे/मध्ये आहे...

## वाचू या ... चिंटू.




## दृष्टिक्षेप

### नाम

| | | |
|---|---|---|
| तो भ्रमणध्वनी (ते -) | ती सायकल (त्या सायकली) | ते कुटुंब (ती कुटुंबे) |
| तो लॅपटॉप (ते -) | ती चावी (त्या चाव्या) | ते मांजर (ती मांजरे) |
| तो बेड (ते -) | ती बाटली (त्या बाटल्या) | ते कपाट (ती कपाटे) |
| तो आरसा (ते आरसे) | ती आई (त्या आया) | ते झाड (ती झाडे) |
| तो कपडा (ते कपडे) | ती आजी (त्या आज्या) | ते अंतर (ती अंतरे) |
| तो भाऊ (ते -) | ती ताई (त्या ताया) | ते पान (ती पाने) |
| तो / ते बाबा (ते -) | ती मावशी (त्या मावश्या) | ते भांडण (ती भांडणे) |
| तो / ते आजोबा (ते -) | ती मामी (त्या माम्या) | |
| तो / ते काका (ते -) | ती बहीण (त्या बहिणी) | |
| तो दादा (ते -) | ती काकी / काकू (त्या काक्या) | |
| तो / ते मामा (ते -) | ती आत्या (त्या -) | |
| तो मित्र (ते -) | ती मैत्रीण (त्या मैत्रिणी) | |
| तो नवरा (ते नवरे) | ती बाग (त्या बागा) | |
| तो परिवार (ते -) | ती वही (त्या वह्या) | |
| तो प्रसंग (ते -) | ती खोली (त्या खोल्या) | |
| | ती मालिका (त्या -) | |
| | ती भूमिका (त्या -) | |
| | ती मालकी | |
| | ती वेळ (त्या वेळा) | |

| क्रियापद | क्रियाविशेषण | प्रश्नशब्द | इतर शब्द |
|---|---|---|---|
| भुंकणे | हळू | कोणाचा | महाग |
| भेटणे | जलद | कोणाची | सफेद |
| चालणे | अनेकदा | कोणाचे / चं | खास |
| | क्वचित | | भिन्न |
| | भरपूर | | स्वस्त |
| | पटकन | | |

## आता मला हे येतं.

**संबंध दाखवणे**

☐ उत्तम ☐ चांगलं ☐ जेमतेम ☐ फारच कमी

**स्वत :च्या कुटुंबाबद्दल माहिती सांगणे**

☐ उत्तम ☐ चांगलं ☐ जेमतेम ☐ फारच कमी

**मालकी हक्क**

☐ उत्तम ☐ चांगलं ☐ जेमतेम ☐ फारच कमी

**१०० च्या पुढील अंक**

☐ उत्तम ☐ चांगलं ☐ जेमतेम ☐ फारच कमी

**प्रश्नशब्द: कोणाचा, कोणाची, कोणाचे**

☐ उत्तम ☐ चांगलं ☐ जेमतेम ☐ फारच कमी

